# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता आठवी : पूर्व चाचणी

**इयत्ता : आठवी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................................ **हजेरी क्र. :** ...................

**शाळेचे नाव :** ........................................................................ **दिनांक :** ......................

(**सूचना :** आवश्यकतेनुसार उत्तर लेखनासाठी पुरवणी कागद/वही वापरावी.)

**प्र. १) पुढे दिलेला परिच्छेद काळजीपूर्वक वाच व विचारलेल्या कृती सोडव. (07.01.21)**

उन्हं मावळली होती. संध्याकाळ होत होती. सगळीकडं फिकट केशरी–नारिंगी रंगाचा उजेड भुरभुरत होता. साचलेल्या पाण्याला कोवळ्या संत्र्याच्या सालीचा रंग आला होता. झाडांचे हिरवे शेंडे केशरी–नारिंगी रंगाच्या मिश्रणात न्हाऊन निघाले होते. हा संधिप्रकाश कुठल्याही वस्तुमात्रापेक्षा देखणा वाटत होता. आईनं बजावून सांगितल्याप्रमाणं आपली दिशा सांभाळीत पाखरं आपल्या घरट्याकडं परतत होती. यात पाखरांच्या जगातल्या शिस्तीचा भाग किती होता कुणास ठाऊक! पण रोज असं घरट्याकडं परतताना पाखरांना उमजलं असावं की, घरटंसुद्धा वाट पाहतं; त्यालाही पाखरभेटीची उत्कट इच्छा होते. आपण परतू ते घरटं आपलंच आहे, यावरला पाखरांचा विश्वास त्यांच्या फडफडाटातूनच मला जाणवत होता...

**१) एका शब्दात उत्तरे लिही.** **(२ गुण)**

अ) परिच्छेदात वर्णन केलेली वेळ : ....................................................

आ) सगळीकडे भुरभुरत असणारा रंग : ....................................................

**२) कारणे लिही.** **(२ गुण)**

अ) साचलेल्या पाण्याला संत्र्याच्या सालीच रंग आला होता.

........................................................................................................

........................................................................................................

आ) पाखरं घरट्याकडे परतत होती.

........................................................................................................

........................................................................................................

**३) उपरोक्त उताऱ्यास शीर्षक दे.** **(२ गुण)**

........................................................................................................

**प्र. २) खालील कविता काळजीपूर्वक वाच व दिलेल्या कृती सोडव. (07.01.08)**

‘आई’ म्हणोनी कोणी, आईस हाक मारी
ती हाक येई कानी, मज होय शोककारी
नोहेच हाक माते, मारी कुणी कुठारी
‘आई’ कुणा म्हणू मी? आई घरी न दारी!

चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई
गोठ्यात वासरांना ह्या चाटतात गाई
वात्सल्य हे बघुनी व्याकूळ जीव होई

येशील तू घराला परतून केधवा गे?
रुसणार मी न आता जरी बोलशील रागे
‘आई’ कुणा म्हणू मी, आई घरी न दारी
स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी



१) कवी दु:खी होण्याचे कारण **(१ गुण)**

..........................................................................................................

२) कवितेत आलेले दोन प्राणी : ........................ ........................ **(१ गुण)**

३) पिलांच्या मुखात चारा भरवणारी : ................................................

४) कवितेतील यमक जुळणाऱ्या जोड्या शोधून लिही. **(२ गुण)**

................................................ ................................................

................................................ ................................................

५) ‘वात्सल्य’ शब्दाचा तुला समजलेला अर्थ लिही. **(२ गुण)**

..........................................................................................................

..........................................................................................................

प्र. ३) **खालील व्याकरण कृती सोडव.** (07.01.27)

**अ) पुढील शब्दासाठी चार समानार्थी शब्द लिही.** (२ गुण)

| | | |
|---|---|---|
| .................................... | | .................................... |
| | सूर्य | |
| .................................... | | .................................... |

**ब) खालील म्हणींचा तुला समजलेला अर्थ लिही.** (२ गुण)

१) थेंबे थेंबे तळे साचे : ..............................................................................

२) हातच्या कांकणाला आरसा कशाला : ............................................................

**क) खालील वाक्यांतील अव्यय शोधून लिही.** (२ गुण)

१) पूर्वी यंत्रांचा फार उपयोग केला जात नसे. ..................................

२) राघवचे घर मंदिराजवळ आहे. ..................................

३) मुक्ताईने तुळशीसमोर दिवा लावला. ..................................

४) पुण्यात शिकायला गेल्यानंतर अलकनंदेची भेट झाली नाही. ..................................

**ड) खालील वाक्याचा प्रकार ओळखून लिही.** (१ गुण)

१) अरे सुरेश, किती हा तुझ्या कपड्यांचा ढीग! ..................................................

**इ) खालील वाक्य लेखननियमांनुसार दुरुस्त करून लिही.** (१ गुण)

१) पावसाळ्यात धरतिने हिरवा शालु पांघरला.

....................................................................................................

प्र. ४) **खालील विषयाला अनुसरून निबंध लेखन कर.** (07.01.13) (07.01.14) (५ गुण)

**माझा आवडता ऋतू**

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

**प्र. ५) काव्यवाचन स्पर्धेमध्ये तुझ्या मित्र/मैत्रिणीचा पहिला क्रमांक आला आहे. त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिही. (07.01.13) (५ गुण)**

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................

..................................................................................................................